नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०३/०८/२०२५ (रविवार)**

## अग्निशस्त्रांचा धाक दाखवुन जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक, ४ तासात जबरी चोरीचे २ गुन्हे उघड अग्निशस्त्रांसह ८,३२,०८०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त

**नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस स्टेशन बुटीबोरी आणि पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी येथे खालील प्रमाणे अज्ञात आरोपी विरूध्द दोन जबरी चोरीचे गुन्हे नोंद असुन अवध्या ४ तासात नमुद गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा नागपुर ग्रामीण पोलीसांनी शोध घेतला.**

**पोलीस स्टेशन बुंटीबोरी :—** दिनांक ०२/०८/२०२५ रोजीचे दुपारी ०१.४५ वा. दरम्यान बुटीबोरी पोलीस ठाणे अंतर्गत स्टेंट बॅक जवळ फिर्यादी विशाल अशोक निनावे, रा. जुनी वस्ती, बुटीबोरी हे त्यांचे दुचाकी ने स्टेट बॅक ऑफ इंडीया येथे नगदी १५,०००/— रूपये भरण्यासाठी निघाले असता बॅके समोर सातगावचे दिशेने ३ अज्ञात आरोपीतांनी ( अंदाजे ३० ते ३५ वयोगटातील ) एक लाल रंगाचे स्विफ्ट कारने येवुन फिर्यादीला देशी कट्टयाचा धाक दाखवुन फिर्यादीचे पॅन्टचे खिश्यातील १५,०००/— रूपये जबरीने हिंसकावून नेले. सदर घटनेसंदर्भात पोलीस ठाणे बुटीबोरी येथे अप कं ७२७ /२०२५ कलम ३०९ (४), ३ (५) भान्यासं सह कलम ३,२५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बुंटीबोरी :—** बुटीबोरी हद्दीतील घटनेनंतर काही वेळताच एमआयडीसी बुटीबोरी अंतर्गत टाकळघाट येथे वार्ड क्रमांक ०४ मध्ये श्रीमती संगीता प्रभाकर वासाड यांचे शासनमान्य देशी दारूचे दुकानात दुपारी ०२.१० वा. ते ०२.१५ वा. दरम्यान फिर्यादी युगल प्रभाकर वासाड, वय २४ वर्ष, रा. वार्ड नं. ०१, टाकळघाट यांना ३ अज्ञात आरोपीतांन देशी कट्टयाचा धाक दाखवुन फिर्यादीचे काऊन्टरमध्ये ठेवलेले नगदी १५०००/— रू. व आयफोन १२ कि. ४०,०००/— रू. जबरीने चोरून नेले. सदर घटनेबाबत पोलीस स्टेशन

एमआयडीसी बुटीबोरी येथे अप क्रं ३२६ /२०२५ कलम ३०९ (४), ३ (५) भान्यासं सह कलम ३,२५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता मा. श्री. हर्ष ए.पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात श्री. दीपक अग्रवाल सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, नागपूर उपविभाग यांचे नेतृत्वात बुटीबोरी पोलीस , एमआयडीसी बोरी पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांची विविध पथके तयार करून नमुद अज्ञात आरोपीतांचा शोध घेणेकामी रवाना करण्यात आले. सर्व पथकांनी कसुन तपास करीत गोपनीय बातमीदार तसेच तांत्रिक पुराव्याच्या मदतीने आरोपीतांचा शोध घेतला असता सदरचे आरोपी हे वर्धा जिल्हयाकडे रवाना झाले असुन संशयीत वाहनाने नमुद आरोपी हे वर्धा शहरातील जामा मस्जीद चौक परीसरात फिरत असल्याचे समजले. त्यावरून आरोपीतांची आणि वाहनाच्या वर्णनाची माहिती नागपुर ग्रामीण पोलीसांनी वर्धा पोलीसांना दिली. स्थानिक गुन्हे शाखा वर्धा यांच्या मदतीने सदर गुन्हयातील आरोपी क्रं **१) कुणाल सुरेश हेमने, वय २८ वर्षे, रा घर क्रं ९७९८,प्लॉट क्रं १९४, आझाद नगर, बिडगाव नागपुर, आरोपी क्रं २) रविंद्रसिंग लखनसिंग जुनी, वय ३१ वर्षे, रा कारला चौक, हनुमानगढ, वर्धा, आरोपी क्रं ३) मंथन महादेव मोहर्ले, वय २६ वर्षे, रा. वार्ड क्रं ४ बुटीबोरी , जि. नागपुर, आरोपी क्रं ४) तुषार दामोधर सहारे, वय २६ वर्षे, रा दुर्गा मंदीर, बुटीबोरी, जि. नागपुर आणि आरोपी क्रं ५) नयन दत्तु कडु, वय २६ वर्षे, रा संयोग कॉलनी, कारला रोड, पिपरी वर्धा हे पाच आरोपी जामा मस्जीद चौक परीसर, वर्धा येथे मिळून आल्याने नमुद पाचही आरोपीतांना दिनांक ०३/०८/२०२५ रोजी ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातून १) एक गावठी बनावटीचे माउजर, २) एक देशी बनावटीचा कट्टा ३) एक नकली पिस्टल, ४) दोन खाली मॅगझीन, ५) चार नग अ‍ॅन्ड्रॉईड मोबाईल, ६) ४१,९८० /— रूपये रोख रक्कम आणि ७) गुन्हयात वापरलेली चारचाकी वाहन लाल रंगाची स्विफ्ट क्रमांक एम. एच ३२ ए.एक्स. ३८३१ असा एकुण ८,३२,०८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

सदर प्रकरणात पोलीस स्टेशन बुटीबोरी, एमआयडीसी बुटीबोरी ,स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण आाणि स्थानिक गुन्हे शाखा वर्धा जिल्हा च्या विशेष पथकाने कौशल्यपुर्ण आणि

शास्त्रोक्त पध्दतीने तपास करून तांत्रिक पुराव्यांचा वापर करून अवघ्या ०४ तासाचे आत वर नमुद गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणला. नमुद आरोपीतांकडुन चोरीस गेलेला संपुर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एमआयडीसी बोरी पोलीसांनी नमुद आरोपीतांना अटक केली आहे.

## चिखलाबोडी शेतशिवारात सुरू असलेल्या जुगार अड्डयावर धाड, एकुण १२ आरोपी विरूध्द गुन्हा नोंद , नगदी ३,२०,३४०/—रूपये तसेच ९ मोबाईल फोनसह एकुण ५,१४,३९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त, नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

दिनांक ०२/०८/२०२५ रोजी श्री अनिल म्हस्के ,अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने अरोली पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक श्री स्नेहल राउत यांच्या नेतृत्वात अरोली पोलीस स्टेशनचे अधिकारी /अंमलदार आणि पोलीस मुख्यालयाचे अंमलदार यांचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे नागपुर ग्रामीण जिल्हयात पेट्रोलींग करीत असतांना श्री अनिल म्हस्के यांना गोपनिय बातमीदाराने माहीती दिली आहे कि, पोलीस स्टेशन मौदा हद्दीमध्ये चिखलाबोडी शेत शिवारामध्ये सतिष गिरीपुंजे यांच्या शेताला लागुन असलेल्या पेंच नहराचे पारीवरील झोपडीमध्ये काही इसम ५२ ताशपत्त्यांवर पैसे लावुन हारजीत चा जुगार खेळत आहे. श्री अनिल म्हस्के यांनी तात्काळ सदरची माहीती नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधिक्षक मा. श्री हर्ष पोद्दार (भा.पो.से) यांना दिल्याने त्यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार श्री अनिल म्हस्के यांनी वर नमुद पथकाला घटनास्थळी रवाना होणेचे आदेश दिले.. नमुद पथकाने श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या लेखी आदेशाने सदर घटनास्थळी लपत छपत जावुन पाहणी केली असता चिखलाबोडी शेतशिवारात पेंच नहराचे पारीवरील झोपडीमध्ये लाईट सुरू दिसला. पोलीसांनी शिताफिने १२ जुगारी इसमांना जागीच पकडले.यातील आरोपी नामे १) गेंदलाल परसराम किरपान, वय ४५ वर्षे, राह. धानला,तालुका मौदा, जिल्हा नागपूर (प्रमुख),२) जगदीश रामाजी पडोळे, वय ५३ वर्षे, राहणार राहणार वरठी तालुका मोहाडी जिल्हा भंडारा,३) तुषार सुरेश लांजेवार वय ३२ वर्षे राहणार तालुका जिल्हा भंडारा,४) सौरव कडू दांडेकर वय पंचवीस वर्षे राहणार शहापूर तालुका जिल्हा भंडारा,५) अमित अजबराव खोब्रागडे वय ४० वर्ष राहणार वर्टी तालुका

मोहाडी जिल्हा भंडारा,६) ईशान अशोक कटाळे वय ३६ वर्ष राहणार मांगली तालुका मौदा जिल्हा नागपूर ,७) संदीप यादवराव मोटघरे वय ३८ वर्ष राहणार दहिगाव तालुका मौदा जिल्हा नागपूर ,८) संजय कवडू मेहर, वय ४२ वर्षे, र. गांधी वार्ड, मोहाडी, जिल्हा भंडारा, ९) सूरज राजेश माने, वय २७ वर्षे, राह. शिवाजी वार्ड भंडारा,१०) शैलेश पांडुरंग चोपकर, वय ४२ वर्षे, राह. तमासावडी, जिल्हा भंडारा,११) सुरेश भाऊराव सार्वे, वय ३५ वर्षे, राह. गुंजेपार, तालुका जिल्हा भंडारा, १२) आकाश रक्षक बनसोड, वय २६ वर्षे, राह. शहापूर, तालुका हे ५२ ताशपत्त्यांचे जुगार खेळतांना मिळुन आले. नमुद आरोपीतांच्या ताब्यातुलन ५२ ताशपत्ते, **नगदी एकुण ३,२०,३४०/—रूपये, ८ अ‍ॅड्रॉईड मोबाईल, १ किपॅड मोबाईल आणि ईतर साहीत्य असा एकुण ५,१४,३९०/— रूपयांचा मुद्‌देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.**

नमुद १२ आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन मौदा येथे म.जु.का. कलम ४ व ५ अन्वये अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला.



घटनास्थळ चिखलाबोडी शेतशिवारात पेंच नहराचे पारीवरील झोपडी



**कारवाई करणारे पोलीस पथक**

## जनावरांना क्रुरतेने वागवुन अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद २४ जनावरांची (म्हशींची) सुटका,उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग आणि रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :– दिनांक ०२/०८/२०२५ रोजी श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, १० चाकी ट्रकमध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. त्यांनी तात्काळ रामटेक पोलीस आणि उपविभागिय कार्यालय, रामटेक येथील पोलीस अंमलदारांना कारवाईचे आदेश

दिले. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा कांद्री वस्ती गावाचे बस स्टॅंडजवळ नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान १० चक्का ट्रक क्रमांक टि.एस. १२ यु.डी. ३४०८ हे संशयीत वाहन मिळुन आले. नमुद वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये २४ नग म्हशी **(१३ म्हशी आणि ११ रेडकु )** दिसुन आल्या. नमुद जनावरांना चारपाण्याची कोणतीही सोय न करता, निर्दयते कोंबुन जनावरांची  वाहतुक केली जात असल्याचे दिसुन आले. वाहनामध्ये चालकासह दोन इसम मिळुन आला. त्यांना त्यांची नावे आणि  पत्ता विचारले असता आरोपी क्रं १) **चालक नामे रोहीतकुमार अशोककुमार यादव , वय २५वर्ष, रा.  रानीपुर खिरकी, गंजपर जि. पटना राज्य बिहार त्यांच्या सोबत असलेले आरोपी क्रं २) रितेश विरचंद्ररॉय यादव, वय २५ वर्षे रा उफरौल, चकारम ,दसरी जि. वैशाली राज्य बिहार आणि आरोपी क्रं ३) प्रेमजितकुमार बिरबलराय यादव, वय २५ वर्षे,रा.शेरपुर, मनेर, जि. पटना, राज्य बिहार असे सांगितले. आरोपीच्या ताब्यातुन एक  १० चक्का ट्रक क्रमांक टि.एस. १२ यु.डी. ३४०८ किंमती ८,००,०००/— रूपये. व २४ जनावरे (१३ म्हशी आणि ११ रेडकु ) किंमती ५,७५,००० /— रूपये असा एकुण किंमती १३,७५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**वर नमुद आरोपीतांच्या विरूध पोलीस स्टेशन रामटेक येथे प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम  अधिनियम, अन्वये**

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०२/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०३/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. रामटेक उपविभागाअंतर्गत पारशिवणी टाउन, इतगाव, तामसवाडी, मनसर कांद्री येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि सदर कोबिंग ऑपरेशन श्री रमेश बरकते यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. हॉटेल लॉजेस चेक करण्यात आले. नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे

अधिकारी/अंमलदार यांच्या सोबत दंगा नियंत्रण पथक चे अंमलदार हजर होते. रात्रगस्त आणि कोबिंग दरम्यान अवैध दारू बाबत दोन गुन्हे नोंद असुन मोटर वाहन अधिनियम अन्वये १५ कारवाई करण्यात आल्या आहेत.





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने